Epaper

दैनिक जन

सत्याचे प्राईम्स

सम्राट टाईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

। शनिवार, दि. ३ ऑक्टोंबर २०२६ । वर्ष १ । अंक १७३ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

DIGITAL EDITION

टीईटी निकाल रद्द करण्याची कारवाई वैध!

(पान २ वर)



» Selected

नुसरत भरूचा एअर ॲम्ब्युलन्सनं बालीहून मुंबईत

मुंबई: बॉलिवूड अभिनेत्री नुसरत भरूचा हिचा बालीमध्येभीषण अपघातझालाय. या अपघातात नुसरतच्या पाठीच्या कण्याला गंभीर दुखापत झालीय. पाठीच्या कण्यावरच्या शस्त्रक्रियेसाठी नुसरतला तातडीनं बालीहून एअर ॲम्बुलन्सनं शस्त्रक्रियेसाठी बालीहून मुंबईला आणण्यात आलं. सध्या सोशल मीडियावर नुसरत भरूचाचा एक व्हिडीओ तुफान व्हायरल होतोय, सपोर्टवर दिसतेय. तिच्यावर मुंबईतील एका रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. दरम्यान, व्हिडीओमध्ये नुसरतला दुखापतीमुळे होणारा त्रास स्पष्ट दिसतोय. बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री नुसरत भरुचाला एअर ॲम्ब्युलन्सद्वारे मुंबईत आणण्यात आलंय. ती एका प्रोजेक्टच्या कामासाठी बालीला गेलेली आणि काम संपल्यानंतर तिथेच तिनं व्हेकेशन एन्जॉय केलेलं. पण, तिथेच तिचा भीषण अपघात झाला आणि याच अपघातात ती गंभीर जखमी झाली.

ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी २ ऑक्टोबर रोजी शिवाजी पार्कात CJP चे आंदोलन

फडणवीस साहेब महाराष्ट्राचा वारसा विसरु नका'

हक्कांसाठी लढणे हीच महात्मा गांधींना खरी श्रद्धांजली – अभिजित दीपके यांचे विधान

जन सम्राट टाईम्स

मुंबई । या आंदोलनातून महात्मा गांधींना सर्वात मोठी श्रद्धांजली आहे. आपल्या अधिकारांसाठी लढणं हेच गांधींजींना वंदन आहे. महात्मा गांधी यांना इंग्रजांनी जितका त्रास दिला नव्हता, इतका त्रास या संघी लोकांनी आपल्याला दिला आहे. पण गांधी कधी मरू शकत नाही, गांधी या देशाचा आत्मा आहे. अशी टिका सीजेपीचे अध्यक्ष अभिजीत दिपके यांनी केली आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी CJPकडून मुंबईत आंदोलनाची घोषणा करण्यात आली आहे. मुंबईतील दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज पार्कच्या गेट क्रमांक ६ जवळ सीजेपीने आज (२ ऑक्टोबर) पासून आंदोलन सुरू झाले आहे.अभिजीत दिपके म्हणाले की, गोडसेंसारखे हजारो लोक येतील आणि जातील, गोडसेसारखे लोक भित्रे आहेत. पण गांधी या देशाचा आत्मा आहे. हा देश गांधींच्या विचारांचा आहे. गोडसेंच्या विचारधारेच्या लोकांना मी सांगू इच्छितो की , गांधींना कोणी संपवू शकत नाही. पण कोणीतरी येऊन सांगेन की, पण एक महाभाग स्वत:ला नॉनबायोलॉजीकल म्हणवतो, आम्हाला माहितीये



तुम्ही माणूस नाही आहात. गांधी, नेहरू, आंबेडकर यांच्याशी तुलना करण्याची यांची लायकी पण नाही. गांधी कधीही संपणार नाही. जर गांधी या देशाचा आत्मा आहेत तर आंबेडकर या भारताच्या पाठीचा कणा आहेत. तर जवाहरलाल नेहरू हे देशाचे मन आहेत. त्यांच्याशी तुमची तुलना होऊच शकत नाही. पण हे लोक आज काय करत आहेत. निवडणूक जिंकून तुम्ही त्यांच्याहून मोठे होऊ शकत नाहीत. गांधी, नेहरू, आंबेडकर हे देशासाठी त्याग करून, आंदोलने करून मोठे झाले होते. ज्यांना त्यांचे अधिकारही माहिती नव्हते त्यावेळी यांनी त्या लोकांना त्यांचे अधिकार दिले. पण आजचे हे सरकार देशातील नागरिकांचे अधिकार हिसकावू लागले आहेत. तुम्ही देशाला अजून किती लुटणार आहात. नोटबंदी, कोरोना मध्ये देशातील नागरिकांना रस्त्यावर रांगेत उभे केले, अशी टिकाही दिपके यांनी केली.यावेळी बोलताना ते म्हणाले की, देवेंद्र फडणवीस म्हणाले होते. प्रोटेस्टला जाल तर तीन दिवस जेलमध्ये जावे लागेल, तुम्ही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहात. या महाराष्ट्राला एक परंपरा आहे. फडणवीस साहेब या महाराष्ट्राचा वारसा विसरू नका. तुम्ही विसरले असाल आम्ही नाही. फडणवीस साहेब तुम्हाला आम्हाला जेलमध्ये टाकायचं होतं ना. आता टाका आम्हाला जेलमध्ये. असे आव्हानही त्यांनी राज्य सरकारला दिले. या देशात जनता सरकारची निवड करते. पण या नॉनबायोलॉजिकल महामानवाच्या मते, सरकार ठरवणार त्यांचे मतदार कोण असतील आणि नसतील. पण हेच जर आधीच्या सरकारने केले असते तर तुम्ही आजही चहाच्या दुकानात चहा विकला असता.

मुख्य रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात बॅरिकेड्स

एजन्सींची सुरक्षा पथके मोक्याच्या ठिकाणी तैनात करण्यात आली आहेत. याशिवाय, शिवाजी पार्ककडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात बॅरिकेडिंग करण्यात आले आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, आंदोलनाच्या पूर्वीच शिवाजी पार्क मैदानात विद्यार्थ्यांसह ज्येष्ठ नागरिक आणि सीजेपी समर्थक देखील जमू लागल्याचे दिसत आहे. ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणीही उपस्थित आंदोलकांकडून केली जात आहे.मुंबई पोलिसांनी शिवाजी पार्क मैदानाकडे जाणाऱ्या सर्व मुख्य रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात बॅरिकेड्स लावण्यात आले आहेत. पोलिसांचा विरोध आणि परवानगी नसतानाही शिवाजी पार्क मैदानात विद्यार्थ्यांसह ज्येष्ठ नागरिक आणि CJP चे समर्थक जमा झाले असून, त्यांनी ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या घोषणा देण्यास सुरुवात केली आहे.

८ मुलांचा बुडून मृत्यू झाल्यानंतर कारवाई ; पुण्यातील विनर्स अकॅडमी नगरपरिषदेकडून सील

जन सम्राट टाईम्स

पुणे । प्रतिनिधी: पुण्यातील आळंदी येथून रायगडच्या दिवेआगर येथे सहलीसाठी गेलेल्या आठ विद्यार्थ्यांच्या मृत्यूनंतर मोठी कारवाई करण्यात आली आहे. विनर्स अकॅडमीने विद्यार्थ्यांच्या सहलीचं आयोजन केलं होतं. दरम्यान या दुर्घटनेनंतर आळंदी नगरपरिषदेमार्फत शहरातील संबंधित कोचिंग क्लासेस व आस्थापनांची पाहणी करण्यात आली आणि त्यानंतर जप्तीची कारवाई केली. दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर आळंदी नगरपरिषदेच्या पथकाने विनर्स अकादमीच्या इमारतीची प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणीदरम्यान श्री. नारायण हरिभाऊ दस यांच्या मालकीची मालमत्ता क्र. जुना 1137, नवीन LAN00001729 या मिळकतीमध्ये विनर्स अकादमी कोचिंग क्लासेस सुरू असल्याचे निदर्शनास आले.सदर आस्थापनेने नगरपरिषदेकडून आवश्यक व्यवसाय परवाना/ना-हरकत प्रमाणपत्र घेतल्याचे नगरपरिषदेच्या अभिलेखावरून निदर्शनास आले नाही. त्यामुळे लागू असलेल्या कायदे व नियमांनुसार आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार मुख्याधिकारी श्री. माधव खांडेकर यांच्या आदेशानुसार कर विभाग प्रमुख श्रीमती सीमा चारवे यांच्या नेतृत्वाखाली नगरपरिषदेच्या पथकाने विनर्स अकादमीची सदर मिळकत सील करण्याची कार्यवाही केली. या कार्यवाहीदरम्यान पोलीस प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यवाही ही संबंधित आस्थापनांनी आवश्यक परवानग्या व नियमांचे पालन करावे तसेच नगरपरिषदेकडून लागू असलेल्या कायदेशीर तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्याच्या अनुषंगाने करण्यात आली आहे असल्याची माहिती नगरपरिषदेने दिली आहे.



रायगड जिल्ह्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या दिवेआगर समुद्रकिनाऱ्यावर गुरुवारी एक हृदयद्रावक दुर्घटना घडली. आळंदी येथील खासगी अकॅडमीचे विद्यार्थी सहलीसाठी दिवेआगर येथे आले होते. समुद्रात पोहण्यासाठी गेलेल्या विद्यार्थ्यांपैकी आठ जण पाण्यात बुडाले आणि त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. आळंदी येथील विद्यार्थ्यांची सहल दिवेआगरच्या समुद्रकिनारी आली आणि काही क्षणांतच या आनंदाच्या सहलीचे रूपांतर शोकांतिकेत झाले.मिळालेल्या माहितीनुसार, विद्यार्थ्यांचा सुमारे 48 जणांचा समूह दिवेआगर येथे आला होता. यामध्ये विद्यार्थी आणि शिक्षकांचा समावेश होता. समुद्रात पोहण्यासाठी गेलेल्या आठ विद्यार्थ्यांना पाण्याची खोली आणि समुद्राच्या प्रवाहाचा अंदाज आला नाही. त्यानंतर ते पाण्यात वाहून गेले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, पोलीस, प्रशासन तसेच स्थानिक जलक्रीडा कर्मचाऱ्यांनी बचावकार्य सुरू केले. आठही विद्यार्थ्यांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले असून पुढील वैद्यकीय आणि कायदेशीर प्रक्रिया करण्यात आली या दुर्घटनेत यश वानखेडे, सोहम भांडवलकर, तन्मय वहिले, कौस्तुभ दौंड, कैवल्य वासनकर, राजवीर वहिले, प्रणव बनसोडे आणि सुमित अहिरे या विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची प्रशासनाकडून माहिती देण्यात आली आहे या दुर्घटनेनंतर दिवेआगरसह रायगडच्या समुद्रकिनाऱ्यांवरील सुरक्षा व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. समुद्रकिनाऱ्यावर पुरेसे प्रशिक्षित जीवरक्षक, धोकादायक ठिकाणी स्पष्ट सूचना फलक, समुद्रातील भरती-ओहोटीची माहिती आणि पर्यटकांवर प्रभावी देखरेख आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे दरम्यान, या दुर्घटनेतील नेमकी कारणे आणि सहलीदरम्यान आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्या होत्या का, याबाबत चौकशीचे निर्देश देण्यात आल्याचे वृत्त आहेपुण्यातील आळंदी येथून रायगडच्या दिवेआगर येथे सहलीसाठी गेलेल्या आठ विद्यार्थ्यांच्या मृत्यूनंतर मोठी कारवाई करण्यात आली आहे. अकॅडमीने विद्यार्थ्यांच्या सहलीचं आयोजन केलं होतं. दरम्यान या दुर्घटनेनंतर आळंदी नगरपरिषदेमार्फत शहरातील संबंधित कोचिंग क्लासेस व आस्थापनांची पाहणी करण्यात आली आणि त्यानंतर जप्तीची कारवाई केली.

पूर्णेकर प्रकरणाचं वडापावच्या गाडीशी कनेक्शन

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: ठाण्यामधील मानपाडा येथील उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे विभागप्रमुख प्रदीप पूर्णेकरांच्या हत्या प्रकरणामध्ये पोलिसांना मोठं यश मिळालं आहे. या प्रकरणामध्ये गुन्हे शाखेच्या एसआयटीने शुक्रवारी पहाटे साडेचार वाजता या प्रकरणामध्ये पूर्णेकरांवर गोळ्या झाडणाऱ्या शूटरला अटक केली आहे. अटक केलेल्या व्यक्तीचं नाव निखिल यादव असं आहे. याचबरोबर पोलिसांनी पूर्णेकरांवर कोयत्याने हल्ला करणारा आरोपी नितेश पवारलाही ताब्यात घेतलं असून दोघांना 8 ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे निखिल यादव हा वडापावच्या गाडीवर काम करायचा आणि तिथूनच त्याने प्रदीप पूर्णेकरांच्या कार्यालयाची रेकी केल्याची माहिती समोर आली आहे. निखिल आणि नितेश हे दोन्ही आरोपी गोव्याला पळण्याच्या प्रयत्नात असतानाच त्यांना मुंबई-गोवा महामार्गावरील कर्नाळा भागातून अटक केल्याची माहिती पोलिस उपायुक्त अमरसिंह जाधव यांनी दिली. बुधवारी मीरा रोड भागातून ताब्यात घेतलेल्या दोन महिलांच्या चौकशीतूनच निखिल आणि नितेशची माहिती समोर आली. दोघेही कर्नाळा येथील एका दूध डेअरीमध्ये आश्रयाला



होते. तेथील डेअरी चालक नितेशच्या मैत्रिणीच्या संपर्कात होता. दरम्यान, या प्रकरणातील तपासात दोन्ही आरोपींची भूमिका तपासून पाहण्यासाठी पोलिसांकडून चौकशी सुरू आहे. हत्येसाठी या दोघांना शस्त्रे, वाहन आणि इतर साहित्याची व्यवस्था कोणी आणि कशी केली? कटात कुणाचा सहभाग आहे, याचा तपास केला जात आहे. निखिल हा पूर्णेकर राहत असलेल्या मनोरमानगरमध्येच काम करायचा. निखिल येथील एका वडापावच्या गाडीवरच कामाला होता. तो पूर्णेकरांवर पाळत ठेवून होता. त्यानेच पूर्णेकर यांच्यावर गोळीबार केला. नितेशने कोयत्याने वार केला. व्यसनी निखिलला शस्त्रे कोणी दिली. ते चालविण्याचे प्रशिक्षण त्याने कोणाकडून घेतले, याचा शोध घेतला जात आहे. अटक केलेल्या तिन्ही आरोपींकडून शस्त्रे मिळालेली नाहीत.हत्या करण्यापूर्वी ते कुठे गेले 3 होते? या हत्या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे? उर्वरित फरारी आरोपी कुठे आहेत? या हत्येची योजना कुठे आखली ? त्यासाठी मदत आणि रसद कोणी पुरविली? हत्या कोणत्या उद्देशाने केली? या सर्व बाबींची तपासणी करायची असल्याचं पोलिसांनी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी प्रियंका पाटील यांच्यासमोर मांडत आरोपींची पोलिस कोठडी मागितली. खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शैलेश साळवे यांनी आरोपींच्या पोलिस कोठडीची मागणी केली.

'आदित्य ठाकरेला अटक?

मुंबई : ठाण्याच्या मानपाडा परिसरातील ठाकरे गटाचे विभागप्रमुख प्रदीप पूर्णेकर यांच्या हत्येमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. प्रदीप पुर्णेकर यांच्या कार्यालयात घुसून पाच जणांनी त्यांची गोळ्या झाडून आणि कोयत्याचे वार करून निर्घृण हत्या केली होती. याप्रकरणी पूर्णेकर कुटुंबीयांनी शिंदे सेनेच्या नेत्यायाचदरम्यान ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी ठाण्यातील शिवसेना (शिंदे गट) नेत्या तथा माजी महापौर मीनाक्षी शिंदे यांची एक कथित ऑडिओ क्लिप सोशल मीडियावर शेअर केली आहे.

आशियाई खेळांमध्ये 5 सुवर्ण, 2 रौप्य आणि 2 कास्य

जन सम्राट टाईम्स



मुंबई | प्रतिनिधी: आशियाई खेळांचा आज बारावा दिवस आहे आणि भारताच्या खेळाडूंनी या दिनाची सुरुवात दमदार केली आहे. भारताने आजच्या या दिनी 3 वाजपर्यंत पाच गोल्ड मेडलने सुरुवात केली आहे. आज भारतीय बॉक्सिंगसाठी सुवर्ण दिवस होता, भारताचे तीन बॉक्सर हे फायनलमध्ये गोल्ड मेडलसाठी लढले आणि तीनही गोल्ड मेडल सामने भारताने बॉक्सिंगचे जिंकले आहेत. तर कुस्तीपटू सुदीप कलकले याने देखील फायनलच्या गोल्ड मेडल सामन्यामध्ये कमालीचा कमबॅक करत गोल्ड मेडल जिंकले आहेत. त्याचबरोबर आर्चरीमध्ये भारताच्या महिला तिरंदाजांनी सुवर्ण कामगिरी केली आहे. आजच्या या दिनी भारताची कामगिरी कशी राहिली यासंदर्भात सविस्तर वाचा. भारताच्या अंकुश पांघलने पुरुषांच्या ८० किलो वजनी गटाच्या अंतिम सामन्यात दक्षिण कोरियाच्या किम मिनसेओंगचा पराभव करून सुवर्णपदक पटकावले. उपांत्य फेरीत अंकुशने उझबेकिस्तानच्या 75 किलो वजनी गटातील विद्यमान विश्वविजेता फजलिद्दीन एर्किनबोएव्हचा 4-1 असा पराभव केला होता.परवीन हुडाने उत्कृष्ट कामगिरी करत महिलांच्या 65 किलो वजनी गटाचे विजेतेपद पटकावले. भारतीय बॉक्सर परवीन हुडाने आशियाई क्रीडा स्पर्धेत महिलांच्या 65 किलो वजनी गटात सुवर्णपदक जिंकले. तिने चायनीज तैपेईच्या निएन-चिन चेनचा 3-2 असा पराभव केला.भारतीय बॉक्सर लव्हलिना बोरगोहेनने महिलांच्या 75 किलो वजनी गटात चीनच्या बाओ जियाओजीला 5-0 अशा एकमताने पराभूत करून उत्कृष्ट कामगिरी केली आणि सुवर्णपदक जिंकले. आपल्या वाढदिवशीच स्पर्धा करणाऱ्या लव्हलिनाने संपूर्ण लढतीत उल्लेखनीय संयम दाखवला, बाओला पुढे सरकण्याची संधी दिली आणि प्रभावी प्रतिहल्ले करून गुण मिळवले. पहिल्या दोन फेऱ्या जिंकल्यानंतर, तिने तिसऱ्या आणि अंतिम फेरीतही आपले वर्चस्व कायम ठेवले आणि एक सोपा व एकतर्फी विजय मिळवून देशासाठी सुवर्णपदक पटकावले. महिलांच्या रिकर्व्ह सांघिक तिरंदाजी स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून भारताने इतिहास रचला. भारतीय महिलांनी अंतिम सामन्यात विश्वविजेत्या कोरियाला पराभूत केले. विजेतेपदाच्या सामन्यात, 17 वर्षीय कुमकुम मोहोतने संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावत एक अपवादात्मक कामगिरी केली. दबावाखाली उल्लेखनीय संयम दाखवत, कुमकुमने सातत्याने उत्कृष्ट नेमबाजी केली आणि सुवर्णपदक मिळवून देणारा निर्णायक नेम साधला. आशियाई खेळांचा आज बारावा दिवस आहे आणि भारताच्या खेळाडूंनी या दिनाची सुरुवात दमदार केली आहे. भारताने आजच्या या दिनी 3 वाजपर्यंत पाच गोल्ड मेडलने सुरुवात केली आहे. आज भारतीय बॉक्सिंगसाठी सुवर्ण दिवस होता, भारताचे तीन बॉक्सर हे फायनलमध्ये गोल्ड मेडलसाठी लढले आणि तीनही गोल्ड मेडल सामने भारताने बॉक्सिंगचे जिंकले आहेत. तर कुस्तीपटू सुदीप कलकले याने देखील फायनलच्या गोल्ड मेडल सामन्यामध्ये कमालीचा कमबॅक करत गोल्ड मेडल जिंकले आहेत.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

प्रदीप पुर्णेकरांचा खून पचू देणार नाही : संजय राऊत

प्रदीप पुर्णेकर हत्येप्रकरणी संजय राऊतांचा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर थेट हल्लाबोल

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: "प्रदीप पुर्णेकरांचा हा खून आम्ही पचू देणार नाही. गृहमंत्री अमित शाह यांनी महाराष्ट्रात गुंडाराज निर्माण केले आहे. रक्ताने माखलेले कपडे अमित शाह यांच्या अंगावर फेकले पाहिजेत. अमित शाह यांनी सैतान उभे केले आहेत." अशी टिका खासदार संजय राऊत यांनी केली आहे. ते माध्यमांशी बोलत होते.

संजय राऊत म्हणाले की, या हत्येसाठी सर्वस्वी ठाणे पोलीस जबाबदार आहेत. ठाणे पोलीस हे या प्रकरणातील पहिल्या क्रमांकाचे आरोपी आहेत. पोलीस आयुक्त पालकमंत्र्यांचे नोकर आहेत का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.गणेश नाईकांना आवाहन आहे, ठाण्यात जा, पूर्णेकरांच्या घरी जा आणि ठाण्याचे नेतृत्व करा. आम्ही तुमच्या सोबत आहोत. मी आणि आदित्य ठाकरे गेलो नसतो, तर मुख्य आरोपींची नावे समोर आलीच नसती." असा आरोपही संजय राऊत यांनी केला.

या प्रकरणाला राजकीय वळण दिले जात आहे, कारण ही राजकीय हत्या आहे. लेडी डॉन आणि तिच्या पतीची सर्वप्रथम पक्षातून हकालपट्टी केली पाहिजे, जशी रमेश म्हात्रे यांची करण्यात आली. अशी मागणीही संजय राऊत यांनी केली. शिंदे मिनाक्षी शिंदे यांच्या पाठिशी का उभे आहेत? असाही खोचक सवालही त्यांनी उपस्थित केला. तसेच, शिंदेंनी नैतिकता दाखवली पाहिजे, तिची क्लिप ऐकल्यानंतर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी तिला तात्काळ पक्षातून काढून टाकले असते. असंही त्यांनी नमुद केलं. बाळासाहेब ठाकरे यांचे फोटो लावतात, त्यांचे नाव घेतात



आणि स्वतःला त्यांच्या विचारांचे वारसदार म्हणवतात. मात्र आमचा पक्ष हा बाळासाहेब ठाकरे यांचा पक्ष आहे. तुम्ही त्यांच्या विचारांचे वारसदार कसे? या हत्येमुळे एका कुटुंबाला रस्त्यावर आणले आहे. त्यांचा राग व्यक्त करा, शिवी घाला, जशी मी घालतो. हा खून पचणार नाही. असा इशाराही त्यांनी दिला आहे. दिल्लीतील कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाबाबत बोलताना संजय राऊत म्हणाले की, "दिल्लीत आंदोलन होत आहे आणि मुंबईतही CJPचे मुख्य आंदोलन होत आहे. लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात रोष आहे. आदित्य ठाकरे आणि माझी कन्याही CJPच्या आंदोलनात सहभागी होत आहेत. अटक झाली तरी आम्ही तयार आहोत.लग्नासाठी, डीजेसाठी परवानगी मागितली जाते तशी सीजेपीच्या आंदोलनासाठी परवानगी मागण्यात आली, मग फडणवीसांना याचा राग का फडणवीसांनी या आंदोलनालाही परवानगी द्यायला पाहिजे होती. पण तरीही सीजेपीचे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला जात आहे. पण तरीही हे कॉकरोचेस यशस्वी होणार आणि ज्ञानेश कुमारांनाही जावे लागणार, असही त्यांनी म्हटलं आहे. येत्या ४ तारखेलाही इंडिया आघाडीचे मोठे आंदोलन होत आहे. त्याला परवानगी दिली जाते, मग CJPच्या आंदोलनाला परवानगी का नाही?राज्यात हिटलर आणि मुसोलिनीचे राज्य का? इंग्रजांनीही अशा अटी लादल्या नव्हत्या. न्यायालये गुलाम झाली आहेत आणि संघाचे लोक महत्त्वाच्या पदांवर आहेत." अशी टिकाही संजय राऊतांनी यावेळी केली. "प्रदीप पुर्णेकरांचा हा खून आम्ही पचू देणार नाही. गृहमंत्री अमित शाह यांनी महाराष्ट्रात गुंडाराज निर्माण केले आहे. रक्ताने माखलेले कपडे अमित शाह यांच्या अंगावर फेकले पाहिजेत. अमित शाह यांनी सैतान उभे केले आहेत." अशी टिका खासदार संजय राऊत यांनी केली आहे. ते माध्यमांशी बोलत होते.

संजय राऊत म्हणाले की, या हत्येसाठी सर्वस्वी ठाणे पोलीस जबाबदार आहेत. ठाणे पोलीस हे या प्रकरणातील पहिल्या क्रमांकाचे आरोपी आहेत. पोलीस आयुक्त पालकमंत्र्यांचे नोकर आहेत का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.गणेश नाईकांना आवाहन आहे, ठाण्यात जा, पूर्णेकरांच्या घरी जा आणि ठाण्याचे नेतृत्व करा. आम्ही तुमच्या सोबत आहोत. मी आणि आदित्य ठाकरे गेलो नसतो, तर मुख्य आरोपींची नावे समोर आलीच नसती." असा आरोपही संजय राऊत यांनी केला. या प्रकरणाला राजकीय वळण दिले जात आहे, कारण ही राजकीय हत्या आहे.

टीईटी निकाल रद्द करण्याची कारवाई वैध!

२०१८-१९ टीईटी गैरप्रकरणी औरंगाबाद खंडपीठाचा महत्त्वपूर्ण निर्णय

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी : २०१८ आणि २०१९ मधील शिक्षक पात्रता परीक्षा अर्थात टीईटीमधील गैरप्रकाराच्या प्रकरणात उमेदवारांचे निकाल रद्द करण्याची राज्य शासन व महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने केलेली कारवाई वैध असल्याचे मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने स्पष्ट केले आहे. मात्र, संबंधित उमेदवारांना भविष्यात टीईटी परीक्षा देता येणार नाही, अशी कायमस्वरूपी बंदी घालण्याचा निर्णय न्यायालयाने रद्द केला आहे. या प्रकरणाशी संबंधित एकूण ७०१ याचिका दाखल झाल्या होत्या. त्यावर न्या. किशोर सी. संत आणि न्या. जितेंद्र जैन यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. निकाल रद्द करण्याची कारवाई कायम टीईटी परीक्षेतील गैरप्रकाराच्या तपासानंतर काही उमेदवारांचे निकाल रद्द करण्यात आले होते. तसेच त्यांच्यावर भविष्यात टीईटी परीक्षा देण्यास कायमची बंदी घालण्यात आली होती. या कारवाईला संबंधित उमेदवारांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. न्यायालयाने गैरप्रकाराशी संबंधित उमेदवारांचे निकाल रद्द करण्याची परीक्षा परिषदेची कारवाई कायम ठेवली. त्यामुळे संबंधित उमेदवारांचे टीईटी पात्रतेचे निकाल रद्द राहणार आहेत. कायमची बंदी का रद्द? कायमस्वरूपी परीक्षा बंदी घालण्यापूर्वी संबंधित उमेदवारांना त्यांची बाजू मांडण्याची पुरेशी संधी देण्यात आली नसल्याचे न्यायालयाने नमूद केले. त्यामुळे नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचा विचार करता कायमची बंदी



घालण्याची कारवाई टिकू शकत नाही, असा निष्कर्ष न्यायालयाने नोंदवला. त्यामुळे भविष्यात टीईटी परीक्षा देण्यावर घालण्यात आलेली कायमची बंदी रद्द करण्यात आली आहे. सरकारला नव्याने कारवाईची मुभा न्यायालयाच्या निर्णयामुळे संबंधित उमेदवारांना टीईटी परीक्षा देण्याचा मार्ग खुला झाला असला, तरी शासन किंवा संबंधित परीक्षा यंत्रणेला पुढील कारवाई करण्यास न्यायालयाने पूर्णपणे प्रतिबंध केलेला नाही. संबंधित उमेदवारांविरोधात नव्याने कारवाई करायची असल्यास त्यांना आपली बाजू मांडण्याची योग्य आणि पूर्ण संधी देणे आवश्यक राहणार आहे. ही प्रक्रिया ३१ डिसेंबर २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश न्यायालयाने दिल्याचे या प्रकरणातील माहितीत नमूद करण्यात आले आहे. काही याचिका फेटाळल्या दरम्यान, टीईटी गैरप्रकरणाच्या तपासासंदर्भात पोलिसांनी जबाब नोंदविल्याची माहिती न्यायालयापासून लपविल्याचे आढळलेल्या काही याचिकाकर्त्यांच्या याचिका न्यायालयाने फेटाळल्या. त्यामुळे अशा याचिकाकर्त्यांना या निर्णयाचा लाभ मिळणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या निर्णयामुळे एका बाजूला टीईटी निकाल रद्द करण्याची कारवाई कायम राहिली आहे, तर दुसऱ्या बाजूला कायमस्वरूपी परीक्षा बंदीच्या कारवाईला न्यायालयाने मर्यादा घातली आहे.

त्यामुळे संबंधित उमेदवारांच्या भविष्यातील टीईटी परीक्षेच्या संधीबाबत पुढील कारवाई आता शासन व परीक्षा यंत्रणेकडून न्यायालयाने घालून दिलेल्या प्रक्रियेनुसार होणार आहे. टीईटी निकालावर आधारित पुढील प्रक्रियेत सहभागी होण्याची अपेक्षा असलेल्या उमेदवारांसाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. निकाल रद्द झाल्यानंतर संबंधित उमेदवारांच्या पात्रतेवर, प्रमाणपत्रांवर अथवा पुढील भरती प्रक्रियेतील सहभागावर नेमका काय परिणाम होणार, याबाबत आता अधिकृत निर्णयाची प्रतीक्षा आहे. विशेषतः टीईटीच्या निकालावर आधारित शिक्षक भरतीसाठी तयारी करणाऱ्या उमेदवारांमध्ये या निर्णयामुळे अस्वस्थता निर्माण होण्याची शक्यता आहे. अनेक उमेदवारांनी परीक्षेच्या निकालाच्या आधारे पुढील शैक्षणिक किंवा नोकरीसंबंधी नियोजन केलेले असते. त्यामुळे अशा परिस्थितीत शासनाने पुढील प्रक्रिया स्पष्ट करणे महत्त्वाचे ठरणार आहे. न्यायालयाचा निर्णय आल्यानंतर आता संबंधित परीक्षा प्राधिकरण आणि शासनाकडून पुढील पाऊल काय उचलले जाते, याकडे लक्ष लागले आहे. निकाल रद्द करण्याची प्रक्रिया वैध ठरल्यानंतर पुढील परीक्षा, सुधारित निकाल, संबंधित उमेदवारांची पात्रता किंवा अन्य पर्यायी प्रक्रिया याबाबत अधिकृत सूचना जारी होण्याची शक्यता आहे. मात्र, या संदर्भात अंतिम निर्णय शासन आणि संबंधित सक्षम प्राधिकरणाकडून अधिकृतरीत्या जाहीर झाल्यानंतरच उमेदवारांना पुढील दिशा स्पष्ट होणार आहे. त्यामुळे सोशल मीडिया किंवा अनधिकृत माध्यमांवर प्रसारित होणाऱ्या माहितीकडे उमेदवारांनी सावधगिरीने पाहण्याची आवश्यकता आहे. शिक्षक पात्रता परीक्षा ही शिक्षक भरती प्रक्रियेतील महत्त्वाची पायरी असल्याने तिच्या आयोजनापासून निकाल जाहीर होईपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि विश्वासार्ह असणे अपेक्षित असते.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

सायबर कॉन्क्लेव्ह मधून 'सेफ इंडिया'च्या ध्येयाकडे वाटचाल : भंडारी



जन सम्राट टाईम्स

धुळे | प्रतिनिधी : सायबर गुन्हेगारी, ऑनलाइन फसवणूक आणि डिजिटल माध्यमांच्या वाढत्या धोक्यांपासून नागरिकांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने खान्देश सायबर कॉन्क्लेव्ह 2.0चे आयोजन २ ऑक्टोबर २०२६ रोजी धुळे येथे करण्यात आले. स्व. माजी न्यायमूर्ती, मुंबई उच्च न्यायालय विजयरावजी कोतवाल यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सायबर जारगन एलएलपी, धुळे पोलिस विभाग आणि सायबर अवेअरनेस फाउंडेशन यांच्या संयुक्त नियोजनातून हा कार्यक्रम पार पडला. बाबासाहेब कोतवाल ट्रस्ट, क्युमाईन क्लबसमोर, जेल रोड येथे आयोजित या परिषदेत डिजिटल युगातील विविध सायबर धोक्यांवर मार्गदर्शन करण्यात आले. डिजिटल अरेस्ट, बँकिंग फ्रॉड, फिशिंग, म्युल अकाउंट, हनी ट्रॅप, बँक खाते फ्रीज होणे यांसह ऑनलाइन फसवणुकीच्या विविध प्रकारांची माहिती उपस्थितांना देण्यात आली. यावेळी अतिरिक्त पोलिस अधीक्षक डॉ. अजय देवरे, सायबर तज्ज्ञ ॲड. चैतन्य भंडारी, सायबर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुरेशकुमार घुसर आणि ॲड. प्रशांत वाघ यांनी युवा वर्ग, ज्येष्ठ नागरिक तसेच धुळेकरांना सायबर सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन केले. सायबर फसवणुकीपासून सावध राहण्याचे आवाहन डिजिटल व्यवहार वाढत असताना सायबर गुन्ह्यांचे स्वरूपही बदलत आहे. त्यामुळे अनोळखी लिंकवर क्लिक करणे, संशयास्पद व्यक्तींना बँकिंग अथवा वैयक्तिक माहिती देणे, OTP किंवा इतर गोपनीय माहिती शेअर करणे याबाबत नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले. ऑक्टोबर २०२६ हा देशभरात सायबर जनजागृती उपक्रमांसाठी वापरला जात असल्याच्या पार्श्वभूमीवर या कार्यक्रमातून नागरिकांमध्ये डिजिटल सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्यावर भर देण्यात आला. शेकडो नागरिकांचा सहभाग कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अतिरिक्त पोलिस अधीक्षक डॉ. अजय देवरे होते. यावेळी सायबर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुरेशकुमार घुसर, धुळे जिल्हा सरकारी वकील देवेंद्रसिंह तंवर, ॲड. यतीश जी. गुजराथी, धुळे जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. राहुल भामरे, ॲड. मोहन एस. भंडारी यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. परिषदेला शेकडो युवक तसेच धुळेकर नागरिकांनी उपस्थिती लावली. सायबर सुरक्षिततेसंदर्भातील माहिती आणि मार्गदर्शनामुळे कार्यक्रमातून जनजागृतीचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ॲड. पूजा प्रजापत, ॲड. प्राजक्ता राणा, ॲड. चार्मिश भंडारी, ॲड. भाग्यश्री भंडारी यांनी सहकार्य केले. बाबासाहेब कोतवाल ट्रस्टचेही विशेष सहकार्य लाभले.

प्रल्हादनगर भुसावळ येथे महिला धम्म उपासिका प्रशिक्षण शिबिर

भारतीय बौद्ध महासभा महिला शाखेतर्फे शिबिर

जन सम्राट टाईम्स

भुसावळ । प्रतिनिधी: भारतीय बौद्ध महासभा, जळगाव जिल्हा पूर्व अंतर्गत भुसावळ महिला शाखेच्या वतीने प्रल्हादनगर येथे आयोजित १० दिवसीय महिला धम्म उपासिका प्रशिक्षण शिबिराचा उद्घाटन सोहळा १ ऑक्टोबर २०२६ रोजी धम्ममय वातावरणात उत्साहात पार पडला. जळगाव जिल्हा पदाधिकारी, शहर शाखेचे महिला व पुरुष पदाधिकारी तसेच समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते धूप-दीप प्रज्वलित करून त्रिशरण व पंचशील ग्रहण करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन भारतीय बौद्ध महासभा जळगाव जिल्हा पूर्व महिला विभागाच्या अध्यक्षा प्रियंका ताई अहिरे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभा भुसावळ शहर अध्यक्षा प्रतिभाताई सोनवणे होत्या. उद्घाटनप्रसंगी महाराष्ट्र राज्य संघटक लताताई तायडे, जळगाव



जिल्हाध्यक्ष सुमंगल अहिरे गुरुजी आणि महिला विभागाच्या सरचिटणीस वैशालीताई सरदार यांनी शिबिरार्थी धम्म उपासिकांना शुभेच्छा दिल्या.

शहर पदाधिकाऱ्यांची उपस्थिती कार्यक्रमास जिल्हा उपाध्यक्ष संस्कार विभाग सुमित्राताई सर्वटकर, शिबिराच्या मार्गदर्शक रमेश सावळे गुरुजी (जळगाव जिल्हा लेफ्टनंट कर्नल, समता सैनिक दल), जिल्हा संघटक प्रकाश सरदार गुरुजी, समता सैनिक दलाच्या वनिताताई सावळे यांच्यासह जळगाव जिल्हा कार्यकारिणी उपस्थित होती. नागसेन कॉलनी, भुसावळ शहर कार्यकारिणीतर्फे सीमाताई अहिरे (उपाध्यक्ष, संस्कार विभाग), सुनंदा निकम (शहर उपाध्यक्ष, प्रचार व पर्यटन), कमलाताई निकम (उपाध्यक्ष, समता सैनिक दल), विद्याताई तायडे (सचिव, संरक्षण), सुरेखा घोडेस्वार (संघटक), सारिका शिरसाट, प्रभावती कांबळे, छायाताई रोकडे, प्रमिलाताई मस्के, सुनंदाताई सपकाळे आणि छायाताई भोसले यांच्यासह भुसावळ महिला कार्यकारिणीच्या पदाधिकारी व सदस्य उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेखाताई गायकवाड यांनी केले. उपस्थित मान्यवर, पदाधिकारी, शिबिरार्थी महिला आणि समाजबांधवांच्या सहभागामुळे उद्घाटन सोहळा अत्यंत मंगलमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

प्रा. जयश्रीताई वाघ यांनी साकारले पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे सुंदर रांगोळीचित्र

पाणीपुरवठा टाकीजवळ कचऱ्याचे ढीग, आरोग्याचा प्रश्न

जन सम्राट टाईम्स

पाचोरा। प्रतिनिधी: शेठ मुरलीधरजी मानसिंगका साहित्य, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पाचोरा येथे आयोजित महाकुंभ रोजगार मेळाव्याच्या निमित्ताने एम. एम. महाविद्यालय, पाचोरा येथील प्राध्यापिका सौ. जयश्रीताई वाघ यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे सुंदर व देखणे रांगोळीचित्र साकारले. रांगोळीच्या माध्यमातून पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे व्यक्तिमत्त्व साकारताना प्रा. जयश्रीताई वाघ यांनी आपल्या कलात्मक प्रतिभेचा आणि सूक्ष्म निरीक्षणशक्तीचा सुरेख आविष्कार घडवून आणला. त्यांच्या हातून साकारलेल्या या रांगोळीचित्राने रोजगार मेळाव्यास उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. उपस्थितांनी त्यांच्या कलाकृतीचे कौतुक करत उत्स्फूर्तपणे दाद दिली.कला हा प्रा. जयश्रीताई वाघ यांच्या व्यक्तिमत्त्वाचा महत्त्वाचा भाग असून त्या Fine Arts मध्ये टॉपर राहिल्या आहेत. शिक्षण, कला, सामाजिक



कार्य आणि विविध गुणांनी समृद्ध असे त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहे. अध्यापन क्षेत्रात कार्यरत असतानाही त्यांनी आपल्या कलागुणांची सातत्याने जोपासना केली असून विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांमध्ये आपल्या कलेच्या माध्यमातून योगदान दिले आहे. कल्पकता आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुरेख संगम पाहायला मिळाला. मेळाव्याच्या निमित्ताने साकारण्यात आलेले हे रांगोळीचित्र उपस्थितांसाठी विशेष आकर्षण ठरले.शेठ मुरलीधरजी मानसिंगका साहित्य, पाचोरा येथे आयोजित महाकुंभ रोजगार मेळाव्याच्या निमित्ताने एम. एम. महाविद्यालय, पाचोरा येथील प्राध्यापिका सौ. जयश्रीताई वाघ यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे सुंदर व देखणे रांगोळीचित्र साकारले. रांगोळीच्या माध्यमातून पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे व्यक्तिमत्त्व साकारताना प्रा. जयश्रीताई वाघ यांनी आपल्या कलात्मक प्रतिभेचा आणि सूक्ष्म निरीक्षणशक्तीचा सुरेख आविष्कार घडवून आणला. त्यांच्या हातून साकारलेल्या या रांगोळीचित्राने रोजगार मेळाव्यास उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. उपस्थितांनी त्यांच्या कलाकृतीचे कौतुक करत उत्स्फूर्तपणे दाद दिली.कला हा प्रा. जयश्रीताई वाघ यांच्या व्यक्तिमत्त्वाचा महत्त्वाचा भाग असून त्या Fine Arts मध्ये टॉपर राहिल्या

शासकीय ।ITI। पाचोरा येथील हिरेचे वक्तृत्व स्पर्धेत यश

जन सम्राट टाईम्स

पाचोरा। प्रतिनिधी: शेठ नारायण बंकट वाचनालय, चाळीसगाव यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या स्व. प्रा. सौ. मंदाताई व स्व. डॉ. शामकांत वा. स्मृती करंडक आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI), पाचोरा येथील COPA ट्रेडची विद्यार्थिनी कु. चेतना रणदीप हिरे हिने उल्लेखनीय यश संपादन केले. कु. चेतना हिने 'वाचाल तर समृद्ध व्हाल' या



विषयावर प्रभावी वक्तृत्व सादर करत स्पर्धेत तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. स्पर्धेच्या पारितोषिक वितरणप्रसंगी प्रमुख पाहुणे DYSP विजय ठाकूरवाड यांच्या उपस्थितीत कु. चेतना हिरे हिचा सन्मानपत्र, पुष्पगुच्छ आणि रोख पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. तिच्या या यशाबद्दल शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पाचोरा यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. तसेच संस्थेतील शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी तिचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. डॉ. शामकांत वा. स्मृती करंडक आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थाकु. चेतना रणदीप हिरे हिने उल्लेखनीय यश संपादन केले. कु. चेतना हिने 'वाचाल तर समृद्ध व्हाल' या विषयावर प्रभावी वक्तृत्व सादर करत स्पर्धेत तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले.

भुसावळ येथे महिला धम्म उपासिका प्रशिक्षण शिबिर

जन सम्राट टाईम्स

भुसावळ। प्रतिनिधी: भारतीय बौद्ध महासभा, जळगाव जिल्हा पूर्व अंतर्गत भुसावळ महिला शाखेच्या वतीने प्रल्हादनगर येथे आयोजित करण्यात आलेल्या १० दिवसीय धम्म उपासिका प्रशिक्षण शिबिराचा उद्घाटन सोहळा १ ऑक्टोबर २०२६ रोजी धम्ममय वातावरणात उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास जळगाव जिल्हा पदाधिकारी, भुसावळ शहर शाखेचे महिला व पुरुष पदाधिकारी तसेच समाजबांधव उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते धूप-दीप प्रज्वलित करून त्रिशरण व पंचशील ग्रहण करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन भारतीय बौद्ध महासभा जळगाव जिल्हा पूर्व महिला विभागाच्या अध्यक्षा प्रियंका ताई अहिरे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भुसावळ शहर अध्यक्षा प्रतिभाताई सोनवणे होत्या. उद्घाटनप्रसंगी महाराष्ट्र राज्य संघटक लताताई तायडे, जळगाव जिल्हाध्यक्ष सुमंगल अहिरे गुरुजी आणि महिला विभागाच्या सरचिटणीस वैशालीताई सरदार यांनी शिबिरार्थी धम्म उपासिकांना शुभेच्छा दिल्या. जिल्हा कार्यकारिणीची उपस्थिती कार्यक्रमास जिल्हा उपाध्यक्ष संस्कार विभाग व शिबिराच्या मार्गदर्शिका सुमित्राताई सर्वटकर, जळगाव जिल्हा समता सैनिक दलाचे लेफ्टनंट कर्नल रमेश सावळे गुरुजी, जिल्हा संघटक



प्रकाश सरदार गुरुजी, समता सैनिक दलाच्या वनिताताई सावळे यांच्यासह जळगाव जिल्हा कार्यकारिणीचे पदाधिकारी उपस्थित होते. नागसेन कॉलनी, भुसावळ शहर कार्यकारिणीतर्फे सीमाताई अहिरे (उपाध्यक्ष, संस्कार विभाग), सुनंदा निकम (शहर उपाध्यक्ष, प्रचार व पर्यटन), कमलाताई निकम (उपाध्यक्ष, समता सैनिक दल), विद्याताई तायडे (सचिव, संरक्षण), सुरेखा घोडेस्वार (संघटक), सारिका शिरसाट, प्रभावती कांबळे, छायाताई रोकडे, प्रमिलाताई मस्के, सुनंदाताई सपकाळे आणि छायाताई भोसले यांच्यासह भुसावळ महिला कार्यकारिणीच्या पदाधिकारी व सदस्य उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेखाताई गायकवाड यांनी केले.सोहळा मंगलमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. भारतीय बौद्ध महासभा, जळगाव जिल्हा पूर्व अंतर्गत भुसावळ महिला शाखेच्या वतीने प्रल्हादनगर येथे आयोजित करण्यात आलेल्या १० दिवसीय धम्म उपासिका प्रशिक्षण शिबिराचा उद्घाटन सोहळा १ ऑक्टोबर २०२६ रोजी धम्ममय वातावरणात उत्साहात पार पडला.

प्रलंबित चौकशीच्या निषेधार्थ 5 ऑक्टोबरपासून आमरण उपोषणाचा इशारा

मुरलीधर पाटील यांचा शिक्षणाधिकाऱ्यांना अर्ज; २१ ऑगस्टच्या पत्रानंतरही चौकशी प्रलंबित असल्याचा दावा

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी : जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागाकडे प्रलंबित असलेल्या चौकशीबाबत कार्यवाही होत नसल्याचा दावा करत धामणगाव येथील कै. बाबडू सुपडू सपकाळे विद्यालयातील उपशिक्षक मुरलीधर प्रल्हाद पाटील यांनी ५ ऑक्टोबर २०२६ पासून जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी, जळगाव यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. पाटील यांच्या म्हणण्यानुसार, त्यांनी यापूर्वी १८ ऑगस्ट ते २१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण केले होते. त्यानंतर २१ ऑगस्ट रोजी शिक्षणाधिकाऱ्यांकडून पत्र देण्यात आल्याने त्यांनी उपोषण मागे घेतले. या पत्राच्या अनुषंगाने चौकशीची जबाबदारी उपशिक्षणाधिकारी श्रीमती रागिणी चव्हाण यांच्याकडे सोपविण्यात आल्याचे पाटील यांनी सांगितले. त्यानंतर आपण अनेक वेळा चौकशीसंदर्भात चव्हाण यांची भेट घेतली; मात्र समाधानकारक कार्यवाही झाली नसल्याचा त्यांचा दावा आहे. चौकशीला विलंब होत असल्याचा दावा एक महिन्यापेक्षा अधिक कालावधी



उलटूनही चौकशीबाबत ठोस निर्णय अथवा माहिती मिळाली नसल्याने आपण पुन्हा उपोषणाचा निर्णय घेतल्याचे पाटील यांनी म्हटले आहे. यासंदर्भात त्यांनी २३ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना पुन्हा आमरण उपोषणास बसण्याबाबत अर्ज दिला असून, २१ ऑगस्ट रोजी उपोषणापासून परावृत्त करण्यासाठी देण्यात आलेल्या पत्राची प्रतही सादर केल्याचे त्यांनी सांगितले. आता प्रलंबित चौकशीबाबत कार्यवाही व्हावी, जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा मुरलीधर पाटील यांनी दिला आहे. दरम्यान, पाटील यांनी केलेल्या आरोपांबाबत शिक्षण विभागाची अधिकृत भूमिका किंवा चौकशीची सद्यस्थिती याबाबत स्वतंत्र माहिती उपलब्ध झालेली नाही. संबंधित प्रशासनाची बाजू समोर आल्यानंतर या प्रकरणातील वस्तुस्थिती अधिक स्पष्ट होऊ शकणार आहे. जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागाकडे प्रलंबित असलेल्या चौकशीबाबत कार्यवाही होत नसल्याचा दावा करत धामणगाव येथील कै. बाबडू सुपडू सपकाळे विद्यालयातील उपशिक्षक मुरलीधर प्रल्हाद पाटील यांनी ५ ऑक्टोबर २०२६ पासून जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी, कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. पाटील यांच्या म्हणण्यानुसार, त्यांनी यापूर्वी १८ ऑगस्ट ते २१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण केले होते. त्यानंतर २१ ऑगस्ट रोजी शिक्षणाधिकाऱ्यांकडून पत्र देण्यात आल्याने त्यांनी उपोषण मागे घेतले.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

उल्हासनगरातील स्वीकृत नगरसेवक निवड प्रक्रियेवर सवाल

शिक्षणतज्ज्ञांच्या पात्रतेपासून अनधिकृत बांधकामाच्या अपात्रतेपर्यंत प्रश्नचिन्ह

जन सम्राट टाईम्स

उल्हासनगर :। प्रतिनिधी: उल्हासनगर महानगरपालिकेतील स्वीकृत नगरसेवकांच्या निवड प्रक्रियेवरून पुन्हा एकदा वाद निर्माण झाला आहे. राजकीय पक्षांमधील आरोप-प्रत्यारोपांच्या पलीकडे आता या प्रक्रियेत उमेदवारांची पात्रता तपासताना प्रशासनाने कोणते निकष लावले, कागदपत्रांची पडताळणी कशी केली आणि संबंधित कायदेशीर तरतुदींचा नेमका अर्थ कसा लावला, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते प्रशांत ल. ढोणे यांनी महापालिका आयुक्तांच्या निर्णयप्रक्रियेवर गंभीर आक्षेप घेतले आहेत. प्रशासनाने राजकीय दबावाखाली निर्णय घेतल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. मात्र, या आरोपांवर संबंधित आयुक्त किंवा संबंधित उमेदवारांची स्वतंत्र भूमिका समोर आलेली नाही. शिक्षणतज्ज्ञाच्या पात्रतेवर नेमका निकष काय? महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ५ अंतर्गत स्वीकृत नगरसेवकांची नियुक्ती केली जाते. त्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका (Qualifications and Appointment of Nominated Councillors) Rules, 2012 लागू आहेत. या नियमांनुसार उमेदवाराकडे महानगरपालिका प्रशासनातील विशेष ज्ञान किंवा अनुभव असणे अपेक्षित असून, शिक्षणतज्ज्ञाच्या श्रेणीत मान्यताप्राप्त शाळा किंवा महाविद्यालयातील प्राध्यापक, व्याख्याता, प्राचार्य, मुख्याध्यापक आदींचा किमान पाच वर्षांचा अनुभव नमूद करण्यात आला आहे. याच मुद्द्यावर ढोणे यांनी एका उमेदवाराची पात्रता तपासणी कशी करण्यात आली, असा सवाल उपस्थित केला आहे. त्यांच्या दाव्यानुसार संबंधित उमेदवाराने



कुटुंबाशी संबंधित महाविद्यालयातून अंशकालीन व विनामानधन व्याख्याता म्हणून काम केल्याचे प्रमाणपत्र सादर केले असून, त्याच्या आधारे उमेदवारी ग्राह्य धरण्यात आली. मात्र, नियुक्तीची प्रक्रिया, सेवा नोंदी, हजेरीपट, वेतन/मानधन नोंदी, नियुक्ती आदेश आणि संबंधित संस्थेची अधिकृत मान्यता यांची पडताळणी झाली का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

